07 DEC 2022
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नॉनस्टिक वस्तूंमुळे यकृताचे विकार जडण्याचा धोका

## उदयन आपटे : शिवाजी विद्यापीठातील प्राणिशास्त्र अधिविभागात व्याख्यान

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** दैनंदिन जीवनात वापरल्या जाणाऱ्या नॉनस्टिक वस्तूंमुळे यकृताचे विकार उद्भवण्याची शक्यता असते. त्यामुळे त्यांचा अतिवापर टाळावा, असा सल्ला अमेरिकेतील कान्सास विद्यापीठातील फार्मेकॉलॉजी-टॉक्झिकॉलॉजी विभागातील शास्त्रज्ञ डॉ. उदयन आपटे यांनी दिला.

शिवाजी विद्यापीठाच्या प्राणिशास्त्र अधिविभागात 'डेसिफरिंग मॅकेनिझम्स ऑफ लिव्हर टॉक्झिसिटी इन्ड्युस्ड बाय पॉलिफ्लुरोअल्काईल सबस्टन्सेस (पीएफएएस) युजिंग ग्लोबल जीन एक्स्प्रेशन एनालिसिस' या विषयावर त्यांचे विशेष व्याख्यान झाले. नॉनस्टिक भांडी, रेनकोट, वॉटरप्रुफ मेकअप उत्पादने अतिवापरामुळे यकृताचे आजार होऊ शकतात. पीएफएएस रसायनांच्या अतिवापरामुळे रोगप्रतिकारक शक्ती, प्रजननक्षमता, गर्भवाढ आणि यकृतावर दुष्परिणाम होतात, असे डॉ. आपटे यांनी सांगितले. प्राणिशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. आशिष देशमुख यांनी मनोगत व्यक्त केले.

### सूज येणे, चरबी साठण्याचे प्रकार

पीएफएएसचा अर्धायुकाल (हाफ लाईफ पीरियड) तीन वर्षांचा असून त्याचे विघटन लवकर होत नाही. त्याचा यकृताशी संबंध आल्यास यकृताला सूज येणे, यकृतात चरबी साठणे तसेच हायपर कोलेस्ट्रोलेमियाचा धोका उद्भवतो. या संशोधनामध्ये अमेरिकी लोकांच्या रक्तामध्ये पीएफएएसचे अंशही आढळून आले आहेत, असे डॉ. आपटे यांनी सांगितले.

07 DEC 2022

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# क्रीडा महोत्सवात शिवाजी विद्यापीठ अग्रस्थानी

## सुवर्णपदकांची कमाई : खेळाडूंची दमदार कामगिरी; औरंगाबादमध्ये स्पर्धा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** औरंगाबाद येथे सुरू असलेल्या २४व्या आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सवात शिवाजी विद्यापीठाच्या संघातील खेळाडूंनी दमदार कामगिरी करत अग्रस्थान मिळविले आहे. या संघाने १० सुवर्ण आणि प्रत्येकी चार रौप्य, कांस्यपदकांची कमाई केली आहे.



औरंगाबाद येथे सुरू असलेल्या २४ व्या आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सवात शिवाजी विद्यापीठाच्या मुलींच्या खो-खो संघाने उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे.

या महोत्सवात विद्यापीठाच्या संघातील निखिल पाटील (१०० मीटर धावणे, सुवर्ण), इंद्रजित फराकटे आणि रोहिणी पाटील (१५०० मीटर धावणे, सुवर्णपदक), सुशांत जेधे (५ हजार मीटर धावणे, सुवर्ण), श्रावणी देसावळे (उंच उडी, सुवर्ण), प्रफुल्ल थोरात (थाळीफेक, रौप्य), प्राजक्ता शिंदे (५ हजार मीटर धावणे, रौप्य), सिद्धी कारंडे (थाळीफेक, कांस्य), प्रतिक पाटील (१०० मीटर धावणे, कास्य), सत्यजीत पुजारी (१५०० मीटर धावणे, कास्य), सिद्धी कारंडे (गोळाफेक, कांस्य), संपदा धुमाळ (लांब उडी, सुवर्ण), प्रफुल्ल थोरात (शॉर्ट पट, सुवर्ण), शुभम जाधव (भालाफेक, सुवर्ण), निखिल पाटील, वल्लभ पाटील, तुषार काळुखे, अक्षय पाटील ४ बाय १०० मीटर रिले, सुवर्ण), श्रेया मुळीक, रिया पाटील, संपदा धुमाळ, राधा मगर (४ बाय १०० मीटर रिले, रौप्यपदक) यांनी यश मिळविले. दरम्यान, या महोत्सवात विद्यापीठाचा १४० जणांचा संघ सहभागी झाला आहे.

### बास्केटबॉल, खो-खो संघ उपांत्य फेरीत

विद्यापीठाच्या बास्केटबॉल महिला आणि पुरुष संघाने, खो-खो महिला आणि पुरुष संघाने, तर कबड्डी पुरुष संघाने उपांत्य फेरीत प्रवेश केला.

लोकमत

# विद्यापीठात आजपासून 'लोकमाध्यमां'वर कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या जर्नालिझम आणि मास कम्युनिकेशन विभागातर्फे 'संवादाचे प्रभावी साधन : लोकमाध्यमे' या विषयावर आज, बुधवारी आणि उद्या, गुरुवारी कार्यशाळा होणार आहे. त्याचे उद्घाटन विद्यापीठातील मराठी विभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांच्या हस्ते होणार आहे.

शिवशाहीर डॉ. राजू राऊत, लेखक सुनीलकुमार सरनाईक, डॉ. आझाद नायकवडी मार्गदर्शन करणार आहेत. विद्यार्थी, संशोधक, प्राध्यापकांनी कार्यशाळेचा लाभ घ्यावा, असे आवाहन विभागप्रमुख डॉ. निशा पवार यांनी केले.

पुढारी

# नव अभ्यासकांच्या मनन, चिंतनाचेच ज्ञानक्षेत्र विस्तारित होईल : राजन गवस

कोल्हापूर : नव अभ्यासांनी पुस्तक प्रकाशनाची घाई न करता थोडे थांबावे. लिहिलेल्या गोष्टींचे मनन, चिंतन करावे, नंतरच प्रकाशित करण्याचा निर्णय घ्यावा, तरच ज्ञानक्षेत्र विस्तारित होईल, असे मत ज्येष्ठ साहित्यिक राजन गवस यांनी केले. शिवाजी विद्यापीठ मराठी विभागाच्या वतीने आयोजित 'मराठी नवसाहित्याची फलश्रुती' या विषयावरील एक दिवशीय चर्चासत्रात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. कुलगुरू प्रा. शिर्के म्हणाले, नवीन संशोधक विद्यार्थ्यांनी मूलभूत संशोधन करणे ही आजची गरज आहे. चर्चासत्रात ज्येष्ठ समीक्षक प्रा. अविनाश सप्रे, प्रा. नितीन रिंढे यांनी विचार मांडले. पंडित टापरे यांच्या 'नवसाहित्य : एक अभ्यास' या ग्रंथाचे प्रकाशन झाले. प्रास्ताविक मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. नंदकुमार मोरे यांनी केले. चर्चासत्राची भूमिका प्रा. रणधीर शिंदे यांनी मांडली. सूत्रसंचालन सुस्मिता खुटाळे यांनी केले. राजेश पाटील यांनी आभार मानले. यावेळी संस्कृती सुनीताराजे पवार, माजी विभागप्रमुख विश्वनाथ शिंदे, ज्येष्ठ लेखक सुनीलकुमार लवटे उपस्थित होते.

पुढारी

# विद्यापीठात आजपासून आविष्कार संशोधन स्पर्धा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ येथे ७ व ८ डिसेंबर रोजी विद्यापीठस्तरीय आविष्कार २०२२-२३ संशोधन स्पर्धेचे राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृह येथे आयोजन करण्यात आले आहे.

स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजी अधिविभाग या स्पर्धेचा आयोजक आहे. विद्यापीठस्तरीय स्पर्धेत जिल्हास्तरीय स्पर्धेतून निवड



झालेले यूजीचे विद्यार्थी तसेच टीएच प्रवर्गातील सहभागी शिक्षक व पीजी, पीपीजीचे विद्यार्थी सहभागी होतील. संशोधन स्पर्धेत स्पर्धक संशोधन लेख व पोस्टर्स सादर करू शकतात. शक्य असेल त्या ठिकाणी स्पर्धक पी.पी.टी. व मॉडेल्स सादर करू शकतात. विजेत्या स्पर्धकांना बक्षीस व प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. स्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजीचे प्र. संचालक प्रा. किरणकुमार शर्मा, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. पी. टी. गायकवाड यांनी केले आहे.

0 7 DEC 2022

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



विज्ञानाच्या विश्वात

डॉ. व्ही.एन. शिंदे

# मस्कची माकडचेष्टा...

आज सर्वत्र जागतिक तापमानवाढीची चर्चा सुरू आहे. त्यामुळे निसर्गाचे वर्तन लहरी बनले आहे. यामागे मानवाचा निसर्गात सुरू असलेला वाढता हस्तक्षेप हे कारण असल्याचे संशोधक सांगतात. आपण ते मान्यही करतो आणि पुन्हा नवनव्या क्षेत्रात हस्तक्षेप करत राहतो. काही वर्षांपूर्वी क्लोनिंगचे तंत्र विकसित करण्यात आले. त्यातून एका मेंढीला जन्माला घातले. काही दिवसांनंतर तिचे निधन झाले. त्यानंतर क्लोनिंगचे प्रयोग सुरूच ठेवले. त्यातून कृत्रिम अवयव निर्मितीचे तंत्र विकसित करण्यापर्यंत मजल मारली. निसर्ग नियमात हस्तक्षेप केल्याचे तोटे दिसत असूनही मानव आपला हट्ट काही सोडायला तयार नाही. तो नवनव्या क्षेत्रात हस्तक्षेप करतच आहे. हे सर्व आठवण्याचे कारण म्हणजे कर्मचारी कपातीच्या संकटाबरोबर लढत असूनही एलन मस्क यांनी केलेली नवी घोषणा.

'स्पेस एक्स', 'टेस्ला' आणि आता 'टिवट्र' कंपन्याचे मालक एलन मस्क यांचे नवनवे प्रयोग आणि घोषणा सुरूच आहेत. अंतराळ पर्यटनाची संकल्पना अस्तित्वात आणण्यासाठी त्यांचे प्रयोग सुरू आहेत. मानवरहित चारचाकी वाहन चालवण्याचे प्रयोग सुरू आहेत. त्यातच आता त्यांनी मानवाच्या डोक्यात चीप बसवून त्याला नियंत्रित करण्याची घोषणा केली. कृत्रिम बुद्धिमत्ता हा आज सर्वत्र चर्चिला जाणारा विषय. मानवाकडे बुद्धीचा वापर करून विचार करण्याची आणि निर्णय घेण्याची क्षमता आहे. अशी निर्णय घेण्याची क्षमता एखाद्या यंत्रामध्ये निर्माण केल्यास, त्या यंत्राची बुद्धिमत्ता ही 'कृत्रिम बुद्धिमत्ता' मानली जाते. आपल्या आयुष्यात अनेक समस्या येतात. त्या समस्येची उकल आपण आपल्याकडील बुद्धीचा वापर करून करतो. संगणक त्यामध्ये असणाऱ्या संगणक प्रणालीचा वापर करून काही प्रमाणात निर्णय घेतो. संगणकाची प्रणाली 'लॉजिक'वर आधारित बनलेली असते. त्यामुळे मानवाप्रमाणे चौफेर विचार करण्याचे स्वातंत्र्य संगणकाजवळ नसते. तसेच संगणकाला निर्णय घेण्यासाठी आज्ञा द्यावी लागते. त्यानंतरच प्रक्रिया सुरू होते, म्हणजे पुन्हा मानवाच्या नियंत्रणानुसार संगणक चालतो. मात्र, कृत्रिम बुद्धिमत्ता असलेल्या यंत्राला मानवी आज्ञेची गरज नसते. कृत्रिम बुद्धिमत्तेचे यंत्र स्वतःहून निर्णय घेते. यंत्राची बुद्धिमत्ता मानवनिर्मित असते. मात्र, एकदा हे यंत्र तयार झाले की, निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य त्याला असते. काही यंत्रे एखादे चित्र पाहून, पक्षी पाहून त्याबाबतची माहिती देतात. मात्र, त्यांना मर्यादा असतात. कृत्रिम बुद्धिमत्ता असणारा यंत्रमानव वाहन चालवत असेल आणि रस्त्यावर खड्डा आला तर वेग कमी करेल. पुढे दुसरे वाहन अडथळा बनते असे दिसताच आपल्यासाठी पर्यायी रस्ता शोधेल. चालताना रस्त्यावर खड्डा आला, तर तो बाजूला सरकेल. कृत्रिम बुद्धिमत्तेचे यंत्रमानव तयार झाले आहेत. ते अनेक कारखान्यांत धोकादायक परिस्थितीतील कामे करतात. यामुळे अपघातात जाणारे अनेक जीव वाचले आहेत. त्यामुळे काही अंशी यंत्रमानवाची निर्मिती, मानवासाठी वरदान ठरली आहे. मात्र, एलन मस्क यांच्या नव्या घोषणेने 'कृत्रिम बुद्धिमत्ते'चा वेगळ्या अंगाने विचार करणे आवश्यक बनले आहे. मस्क यांनी काही दिवसांपूर्वी संगणक वापरणाऱ्या माकडांचे दोन व्हिडीओ प्रकाशित केले. एका व्हिडीओतील माकड संगणकावर खेळत होते. दुसऱ्या व्हिडीओमध्ये माकड टंकलेखन करत होते. हे सर्व शक्य झाले होते, कारण या माकडांच्या डोक्यामध्ये विशिष्ट चीप बसवल्या होत्या. त्या चीपच्या आधारे माकडांच्या मेंदूची प्रक्रिया कार्यान्वित करण्यात आली होती. मस्क यांचे न्यूरालिंक आर्किटेक्चरशी निगडीत प्रयोग सुरू आहेत. त्यांचा प्रयत्न केवळ तंत्राच्या सहाय्याने कृती पूर्ण व्हावी असा आहे. त्यातूनच अशा चीप मानवाच्या मेंदूमध्ये बसवण्याचे सूतोवाच केले आणि हा खऱ्या अर्थाने चिंतेचा विषय आहे. मस्क तंत्राची घोषणा करताना म्हणतात, 'काही कारणांनी जर एखाद्या व्यक्तीच्या एखाद्या हालचालींवर मर्यादा आल्या, तर अशा प्रकारची चीप त्या माणसाच्या मेंदूमध्ये बसवून त्या मर्यादा हटवता येणे शक्य होईल. तो मानव पूर्ववत नव्हे, तर निरोगी असताना जितक्या कार्यक्षम हालचाली होत, त्यापेक्षा अधिक चांगल्या पद्धतीने होतील; कारण विचारांची गती पकडून यंत्र चालेल. या घोषणेचे हे चांगले रूप दाखवण्याचा मस्क यांचा प्रयत्न आहे. याचे भविष्यात काय दुष्परिणाम होऊ शकतात, याबद्दल कोणतेही भाष्य केलेले नाही. प्रत्येक नव्या तंत्रज्ञानावेळी फायद्याच्या गोष्टी सांगतात. आईनस्टाईनच्या ऊर्जा अक्षयतेच्या सिद्धांतावेळी, अणुऊर्जेचा शोध लागला तेव्हा ऊर्जा प्रश्न सुटल्याची चर्चा झाली. मात्र, हिरोशिमा आणि नागासाकीवरील बॉम्बस्फोटाने शोधाचे दुष्परिणाम दाखवले. हरित क्रांतीवेळीही उत्पादन वाढ पाहिली. जमिनीचे क्षारपड होणे, जल, वायू प्रदूषणाची चर्चा झाली नाही. पाच दशकानंतर हरित क्रांतीचे दुष्परिणाम दिसू लागले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांनी सेंद्रिय शेतीकडे वळावे असा आग्रह धरण्यात येत आहे. एकीकडे कृत्रिम बुद्धिमत्तेचे यंत्रमानव तयार करून ते सीमेवर पाठवण्याचा प्रयत्न चीनकडून सुरू आहे. मस्क यांच्या मानवाच्या मेंदूत चीप बसवून त्याच्या क्रिया नियंत्रित करण्याच्या घोषणेमधून उद्भवणारे दुष्परिणाम तपासायला हवेत. हा निसर्गात हस्तक्षेपच आहे. विशेष म्हणजे ज्या आठ माकडांच्या मेंदूत चीप बसवण्यात आली होती, त्यांचा मृत्यू झाला आहे. एखाद्या सरळ माणसाच्या मेंदूत चीप बसवून त्याच्याकरवी विघातक कृत्य घडवले जाऊ शकते. तसेच मानवी भावभावना, चीपच्या सहाय्याने नियंत्रित करता येतील. चीपच्या सहाय्याने काम, क्रोध, लोभ, मद, मोह, मत्सरांविना मानवांचे वर्तन बनवता येईल. यातून जगणे निरस होईल. कसे असेल... कधीच न भांडणारे जोडपे?

संपर्क : ९६७३७८४४००

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठात अभिवादन

कोल्हापूर : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त मंगळवारी शिवाजी विद्यापीठात त्यांच्या पवित्र स्मृतींना अभिवादन करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची राष्ट्रनिष्ठा, ग्रंथप्रेम आणि ज्ञानसंपादनाप्रति प्रचंड प्रेम या बाबी आजच्या पिढीसाठी मार्गदर्शक व अनुकरणीय आहेत, असे उद्गार कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी काढले. विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रामध्ये आयोजित अभिवादन कार्यक्रमाप्रसंगी कुलगुरू डॉ. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर उपस्थितांनी प्रतिमेस पुष्प वाहून महामानवाप्रति कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता तथा आंबेडकर केंद्राचे प्रमुख डॉ. श्रीकृष्ण महाजन, तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. एस. एन. सपली आदी उपस्थित होते.

0 7 DEC 2022

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात आजपासून आविष्कार स्पर्धा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे दि. ७ व ८ डिसेंबर रोजी विद्यापीठस्तरीय आविष्कार २०२२-२३ संशोधन स्पर्धेचे आयोजन केले आहे. स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजी यांच्या वतीने राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात या स्पर्धा होत आहेत. स्पर्धेची अधिक माहिती शिवाजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. विद्यार्थी, प्राध्यापक व संशोधक यांनी या स्पर्धेचा लाभ घ्यावा, असे आवाहन अधिविभागाचे प्र. संचालक प्रा. किरणकुमार शर्मा, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. पी. टी. गायकवाड यांनी केले.

सकाळ

# शिवाजी विद्यापीठ

डॉ. आंबेडकर यांची राष्ट्रनिष्ठा, ग्रंथप्रेम आणि ज्ञानसंपादनाप्रती प्रचंड प्रेम या बाबी आजच्या पिढीसाठी मार्गदर्शक व अनुकरणीय आहेत, असे उद्‍गार कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी काढले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रात कुलगुरू डॉ. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन केले. प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता तथा आंबेडकर केंद्राचे प्रमुख डॉ. श्रीकृष्ण महाजन, तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. एस. एन. सपली उपस्थित होते.

सकाळ

# आंतरविद्यापीठ राज्य स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ आघाडीवर

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ६ : औरंगाबाद येथील आंतरविद्यापीठ २४ व्या महाराष्ट्र राज्य क्रीडा महोत्सवात शिवाजी विद्यापीठ संघाने अव्वल स्थान कायम राखले.

स्पर्धेत आतापर्यंत मैदानी प्रकारात १० सुवर्ण, चार रौप्य व चार कांस्यपदके पटकावली आहेत. बास्केटबॉल महिला व पुरुष संघाने, खोखो महिला पुरुष संघाने व कबड्डी पुरुष संघाने उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे.

निखिल पाटील १०० मी सुवर्ण, इंद्रजीत फराक्टे १५०० मी सुवर्ण, रोहिणी पाटील १५०० मी सुवर्ण, सुशांत जेधे ५००० मी सुवर्ण, श्रावणी देसावळे उंच उडी सुवर्ण, प्रफुल्ल थोरात थाळीफेक रौप्य, प्राजक्ता शिंदे पाच हजाप मीटर रौप्य, सिद्धी कारंडे थाळीफेक कांस्य, प्रतीक पाटील १०० मी कांस्य, सत्यजित पुजारी १५०० मी कांस्य, सिद्धी कारंडे गोळाफेक कास्य, सुशांत जेधे ५००० मी सुवर्ण, प्राजक्ता शिंदे ५००० मी रौप्य, संपदा धुमाळ लांब उडी सुवर्ण, प्रफुल्ल थोरात शॉट पुट सुवर्ण, शुभम जाधव भालाफेक सुवर्ण, तर सांघिकमध्ये मुलांत निखिल पाटील, वल्लभ पाटील, तुषार काळूखे, अक्षय पाटिल चार बाय १०० मीटर रिले सुवर्ण, मुलींत श्रेया मुळीक, रीया पाटील, संपदा धुमाळ, राधा मगर चार बाया १०० मीटर रिले रौप्यपदक पटकावले.

सकाळ

# डॉ. अण्णासाहेब मोहोळकर यांची सायन्स क्षेत्रात आंतरराष्ट्रीय मोहर

## स्टॅनफोर्ड विद्यापीठाच्या सर्वेक्षणात समावेश



डॉ. मोहोळकर

**कोल्हापूर, ता. ६ :** अमेरिकेच्या स्टॅनफोर्ड विद्यापीठाने केलेल्या सर्वेक्षणात पुन्हा एकदा शिवाजी विद्यापीठाच्या पदार्थविज्ञान विभागाचे शास्त्रज्ञ डॉ. अण्णासाहेब मोहोळकर यांना जागतिक क्रमवारीत दोन टक्के शास्त्रज्ञांमध्ये स्थान मिळाले आहे. त्यांच्या या यशामुळे शिवाजी विद्यापीठाला आंतरराष्ट्रीय बहुमान मिळाला. सौरऊर्जा क्षेत्रात त्यांनी केलेले संशोधन महत्त्वाचे मानले जाते. अल्पेर-डोजर (एडी) सायंटिफिक इंडेक्सने २०२२ मध्ये प्रसिद्ध केलेल्या जागतिक शास्त्रज्ञांच्या यादीत डॉ. मोहोळकर यांना स्थान मिळाले आहे. आपल्या संशोधन अभिवृत्तीस चालना देऊन त्यांनी संशोधन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले. संशोधन क्षेत्रात केलेल्या अतुलनीय कामगिरीबद्दल डॉ. मोहोळकर यांना आजवर अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी सन्मानित केले आहे.

डॉ. मोहोळकर यांनी मटेरियल सायन्स क्षेत्रात केलेल्या संशोधनाची दखल जागतिक स्तरावर घेण्यात आली. सध्या ते सौरऊर्जा, गॅस सेन्सिंग, सुपरकपॅसिटर, वॉटर स्प्लिटिंग, हैड्रोजन एनर्जी आदी विषयांवर पुढील संशोधन करीत आहेत.

तरुण भारत



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा संचालक डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. श्रीकृष्ण महाजन आदी.

## शिवाजी विद्यापीठ

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. डॉ. शिर्के यांनी डॉ. आंबेडकर यांची राष्ट्रनिष्ठा, ग्रंथप्रेम, ज्ञानसंपदाप्रती प्रचंड प्रेम होते, त्या तरूणांना मार्गदर्शक असल्याचे सांगितले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन, आदी उपस्थित होते.

तरुण भारत

## थोडक्यात महत्त्वाचे

# विद्यापीठस्तरीय आज अविष्कार संशोधन स्पर्धा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात ७ व ८ डिसेंबर दोन दिवस विद्यापीठस्तरीय अविष्कार २०२२-२३ संशोधन स्पर्धेचे आयोजन राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभाग्रहात केले आहे. या अविष्कार स्पर्धेचे उद्घाटन आज (दि. ७) सकाळी ११ वाजता होणार आहे. या स्पर्धा स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजी अधिविभागाच्या वतीने घेतल्या आहेत. जिल्हास्तरीय स्पर्धेमधून निवड झालेले पदवी व पदव्युत्तरचे विद्यार्थी आणि शिक्षकांचे प्रदर्शन आज आहे. गुरूवार ८ रोजी पीजी आणि पीपीजीच्या विद्यार्थ्यांचा सहभाग राहील. या संशोधन स्पर्धेमध्ये सहभागी स्पर्धक संशोधन लेख आणि पोस्टर्स सादर करु शकतात. कोणत्याही शाखेमधील विद्यार्थी/शिक्षक खालीलपैकी कोणत्याही शाखेअंतर्गत भाग घेवू शकतात. या स्पर्धेची अधिक माहिती शिवाजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावरती उपलब्ध आहे. तरी सर्व विद्यार्थी, प्राध्यापक व संशोधक यांनी या संशोधनपर स्पर्धेचा लाभ घ्यावा असे आवाहन स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजीचे प्र. संचालक प्राध्यापक किरणकुमार शर्मा व शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. पी. टी. गायकवाड यांनी केले आहे.

0 7 DEC 2022
जनसंपर्क कक्ष
तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# थर्मल ॲनालिसीस विविध क्षेत्रात उपयोगी

## विद्यापीठातील रसायनशास्त्रचे डॉ. घुले यांचे प्रतिपादन

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

बाजारात येणाऱ्या प्रत्येक वस्तूचे तापमान थर्मल ॲनॅलीसिसच्या माध्यमातून मोजले जाते. याचा उपयोग वाहन इंजिन, फार्मा इंडस्ट्री, इंजिनिअरिंग आदी विविध क्षेत्रामध्ये होतो, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठातील रसायशास्त्र अधिविभागाचे डॉ. अनिल घुले यांनी केले.

विद्यापीठात स्तुति अंतर्गत प्रशिक्षण कार्यक्रमात ते बोलत होते. या कार्यक्रमात सहभागी शिक्षक, संशोधक विद्यार्थ्यांना आधुनिक उपकरणांची माहिती देण्यात आली. तसेच प्रत्यक्षपणे हाताळण्याची संधी मिळाली. दुसऱ्या सत्रात डॉ. एच. रामाकृष्णया यांनी 'पोलिमरेज चैन रीॲक्शन" या विषयावर मार्गदर्शन केले. वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. एस. आर. यादव, डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी मार्गदर्शन केले. विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे शास्त्रज्ञ डॉ. अरिंदम भट्टाचार्य यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रा. सोनकवडे हे सर्वोत्तम स्तुति समन्वयकांपैकी एक आहेत जे आपल्या वैज्ञानिक आणि प्रशासकीय अनुभवाचा वापर करून स्तुति अंतर्गत खूप चांगले कार्यक्रम आयोजित करतात, अशा भावना सर्व मान्यवरांनी व्यक्त केल्या.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात स्तुति कार्यक्रमात डॉ. एस. आर. यादव यांचा सत्कार करताना डॉ. आर. जी. सोनकवडे. सोबत डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. रामाकृष्णया, डॉ. अरिंदम भट्टाचार्य.**

तरूण भारत

# शिवाजी विद्यापीठ संघाकडून १८ पदकांची कमाई

- राज्य क्राडी स्पर्धा : पदक तालिकेत विद्यापीठ पहिल्या स्थानावर
- बास्केटबॉल, खो-खो, कबड्डी स्पर्धेतही विद्यापीठ संघाची मुसंडी

प्रतिनिधी
कोल्हापूर

औरंगाबादे येथे सुरु असलेल्या २४ व्या महाराष्ट्र राज्य क्रीडा महोत्सवाअंतर्गत झालेल्या मैदानी स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या संघातील खेळाडूंनी शानदार कामगिरी करत १० सुवर्ण, ४ रौप्य आणि ४ कांस्यपदके पटकावली. या मोठ्या पदकी कामगिरीमुळे शिवाजी विद्यापीठाचा संघ पदकतालिकेत प्रथम स्थानावर आला आहे. बास्केटबॉल स्पर्धेतही विद्यापीठाच्या महिला व पुरुष संघाने दमदार खेळाचे प्रदर्शन करत उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. खो-खो स्पर्धेतसुद्धा विद्यापीठाच्या महिला व पुरुष संघाने आणि कबड्डी स्पर्धेत पुरुष संघाने उपांत्य फेरीत उडी घेऊन दबदबा निर्माण केला आहे.

दरम्यान, स्पर्धेअंतर्गत झालेल्या १०० मीटर धावणेत निखील पाटीलने, १५०० मीटर धावणेत इंद्रजीत फराकटे व रोहिणी पाटीलने तर ५०००, मीटर धावणेत सुशांत जेधे वेगवान धाव करुन सुवर्ण पदकावर कब्जा केला. श्रावणी देसावळेने उंचउडीत सुवर्ण पदकाला तर थाळीफेकमध्ये प्रफुल्ल थोरातने रौप्य पदकाला गवसणी घातली. याचबरोबर ५००० मीटर धावणेत प्राजक्ता शिंदेने रौप्य, थाळीफेकमध्ये सिद्धी कारंडेने कांस्य, १०० मीटर धावणेत प्रतिक पाटीलने कांस्य तर सत्यजीत पुजारीने १५०० मी. धावणेत कांस्य पदकावर अमोहोर उमटवली. तसेच सिद्धी कारंडेने आपल्यातील चुणूक दाखवत गोळाफेकमध्ये कांस्य तर संपदा धुमाळने लांबउडीत, प्रफुल्ल थोरातने शॉटपटमध्ये व शुभम जाधवने भालाफेकमध्ये सुवर्ण पदक पटकावले. निखील पाटील, वल्लभ पाटिल, तुषार काळूखे, अक्षय पाटिल या चौघांनी ४ बाय १०० मी. रिलेत सुवर्ण व श्रेया मुळीक, रिया पाटील, संपदा धुमाळ, राधा मगर यांनी ४ बाय १०० मी. रिले रौप्यपदक जिंकले.